भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१०/२०१७

१) ट्रकच्या धडकेत एक जखमी :—

दिनांक २४/१०/२०१७ चे १६.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी लक्ष्मण मोतीराम सुर्यवंशी वय ५२ वर्ष, रा. पुर्णवसन खैरी अशोक नगर चे मागे याचा भाचा जखमी संजय गुलाब कोसरे वय ३० वर्ष, रा. शहापुर हा त्याचे मोटार सायकल क्र एमएच ३६ सी ३४४५ सुझुकी मॅक्स मोटार सायकलने शहापुर वरुन हरदोली कडे आपल्या आईला आणायला जात असतांनी मोहदुरा गावा जवळ यातील अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्यान फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

२) लाच लुचपत प्रतिबंधक यांची कारवाही :—

दिनांक २४/१०/२०१७ चे १२.१० वाजता दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारी श्री. विक्रम लांजेवार यांना त्याचे आर्थीक सुशिक्षीत बेरोजगार या संस्थेला नगर परीषद तुमसर कडुन मिळालेल्या नगर परिषद विद्युत पथ दिवे व विद्युत यंत्रणेची तक्रार वरीष्ठाकडे न करण्याकरीता देखभाल करीता मिळालेल्या एकुण २,१०,०००/—रु. च्या बिलातुन ५ टक्के प्रमाणे १०,५००/—रु. लाचेची मागणी करुन प्रत्यक्ष सापडा कार्यवाही वेळी १०,५००/—रु. लाच रक्कम पंचा समक्ष स्विकारल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ७,१३(१)(५),१३(२)ला. प्र.का १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी कार्यालय भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) जुण्या वादावरुन लाकडी गाथाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २४/१०/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन कोणतेही कारण नसतांनी फिर्यादीचे वडीला सोबत असलेल्या पुराण्या वादा वरुन फिर्यादी सोबत भांडण करुन पाण्याचे गुंड ठेवण्याचे लाकडी घोडसनीचे गाथाने डोक्याचे मागचे बाजुला जखमी केल्याने फिर्यादी नयन भिमराव बारसागडे वय १९ वर्ष, रा. केसलवाडा यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,३२३,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

४) बिडाचे वालची चोरी :—

दिनांक २०/१०/२०१७ चे २०.०० ते २१/१०/२०१७ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील आबांडी शासकीय वसाहतीला पिण्याचे पाणी सोडण्याकरीता पाण्याचे टाकीजवळ असलेल्या फिल्टर प्लॅन्ट रुम मध्ये ठेवलेले ०३ नग बिडाचे वॉल अंदाजे किंमती १५,००/—रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी किशोर देवीलाल दमाहे सहा अभियता श्रेणी ०१ टेकेपार उपसा सिंचन उपविभागीय कार्यालय आंबाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४६१,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) काचेची बॉटल कपाडावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन वेगवेगळे राहतात फिर्यादीने आरोपी हा घरी हजर नसतांनी त्याची बाज (खाट) काढुन नेली या बाबत आरोपी ने विचारपुस केली असता आरोपीने चिडुन जावुन तीला रिकाम्या बाटलीच्या ढिगाऱ्यावर ढकलुन नंतर अंगावर बसुन काचेची बॉटल कपाडावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**६) चुलबंद नदीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील मृतक शंकर किसन कठाणे वय ६५ वर्ष, रा. विहीरगाव हा मासोळी धुण्यास चुलबंद नदीचे पात्रात गेला असता चुलबंद नदीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी जनार्धन शंकर कटारे वय ४५ वर्ष, रा. विहीरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :**

दिनांक २४/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता